आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दु १.३० वाजता

२८ मार्च २०२४ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना जारी/ या टप्प्यात महाराष्ट्रातल्या ८ जागांचा समावेश
- पहिल्या टप्प्यातल्या उमेदवार अर्जांची छाननी आज होणार
- काँग्रेसची प्राप्तीकर पुनर्मूल्यांकनाची मागणी करणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालायने फेटाळली
- मनरेगा अंतर्गत रोजगाराच्या सुधारित दराची  अधिसूचना जारी
- चालू शैक्षणिक वर्षापासून पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केवळ  नेट स्कोअर, म्हणजेच राष्ट्रीय पात्रता चाचणीचे गुण ग्राह्य धरावेत, असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे निर्देश

  **आणि**
- माद्रिद खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी व्ही सिंधू चा महिला एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना आज जारी झाली. या टप्प्यात देशभरातल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे येत्या  २६ एप्रिलला मतदान होणार आहे. एकूण  १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशात मतदान होणार असून दूसऱ्या टप्प्यात केरळमधे २०, कर्नाटकात १४, राजस्थानात १३ तर उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात प्रत्येकी ८ जागांवर मतदान होणार आहे. मध्य प्रदेशात ७, आसाम आणि बिहारमधे ५, छत्तीसगड आणि पश्चिम बंगालमधे प्रत्येकी ३ तर मणिपूरमधे एका जागेवर निवडणूक होणार आहे.

या टप्प्यातल्या निवडणूकासाठी उमेदवारी अर्ज भरायला आजपासून सुरुवात झाली असून अर्ज भरण्याची शेवटची तारीख ४ एप्रिल आहे. ८ एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येतील. मतदान  २६ एप्रिलला होईल.

महाराष्ट्रात यवतमाळ- वाशिम, बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, हिंगोली, नांदेड, आणि परभणी लोकसभा मतदार संघासाठी आजपासून जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज भरायला सुरुवात झाली आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणूकीच्या पहिल्या टप्प्यासाठी दाखल झालेल्या अर्जांची छानननी आज होणार आहे. अर्ज दाखल करण्याचा काल अखेरचा दिवस होता. या टप्प्यात महाराष्ट्रात नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली-चिमूर या जागांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यासाठी १९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत रामटेकमध्ये ५१, नागपूरमध्ये ६२, भंडारा- गोंदिया ४९, गडचिरोली- चिमूर १९ आणि चंद्रपूरमध्ये ४८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

नागपूरमधून भाजपाचे खासदार नितीन गडकरी आणि काँग्रेसचे विकास ठाकरे यांच्यात प्रमुख लढत होणार आहे. या मतदार संघात वंचित बहुजन आघाडीनं ठाकरेंना पाठिंबा जाहीर केला आहे.

रामटेकमध्ये शिवसेनेचे राजू पारवे आणि काँग्रेसच्या रश्मी बर्वे यांनी आणि भंडारा-गोंदिया मतदारसंघात भाजपचे खासदार सुनील मेंढे यांनी तर काँग्रेसकडून डॉ. प्रशांत पडोळे यांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले.  चंद्रपूरमधून सुधीर मुनगंटीवार आणि माजी खासदार दिवंगत बाळू धानोरकर यांच्या पत्नी प्रतिभा

धानोरकर यांनी आपले अर्ज दाखल केले.  चंद्रपूरमधूनच एकूण  २९ उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत.

गडचिरोली-चिमूर मतदारसंघात भाजपाचे खासदार अशोक नेते, तर काँग्रेसकडून नामदेव किरसान यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या मतदारसंघात एकूण १२ उमेदवारांचे अर्ज दाखल झाले आहेत. येत्या ३० मार्चपर्यंत अर्ज मागे घेता येतील, अशी माहिती निवडणूक आयोगानं दिली.

दरम्यान, रामटेक लोकसभा मतदारसंघात काँग्रेस पक्षाच्या अधिकृत उमेदवार रश्मी बर्वे यांचं जात प्रमाणपत्र जात पडताळणी समितीनं अवैध ठरवलं आहे. हा मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी आरक्षित आहे. हा काँग्रेस करीता मोठा धक्का मानला जात आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात राजकीय तडजोडी आणि जागावाटपासंदर्भात चर्चांना वेग आला आहे. शिवसेनेचे माजी मंत्री विजय शिवतारे यांची काल रात्री मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याबरोबर विशेष बैठक पार पडली. या बैठकीत शिवतारे यांनी मांडलेल्या विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. या संदर्भात लवकरच पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका प्रसार माध्यमांसमोर विस्तृतपणे मांडणार असल्याचं शिवतारे यांनी सांगितलं आहे.

अमरावतीच्या अपक्ष खासदार नवनीत राणा यांनी काल भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी त्यांचं पक्षात स्वागत

केलं. नवनीत राणा अमरावती लोकसभा मतदारसंघातून भाजपाच्या उमेदवार म्हणून निवडणूक लढवणार आहेत.

<><><><><>

२०१७ ते २०२१ या चार वर्षांच्या काळात काँग्रेसवर आकारण्यात आलेल्या प्राप्तीकराच्या फेरतपासणीला आव्हान देणारी याचिका दिल्ली उच्च न्यायालयानं फेटाळली आहे. न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या नेतृत्वाखालच्या पीठानं आज हा आदेश दिला. २०१४-१५ ते २०१६-२०१७ या वर्षांमधे आकारण्यात आलेल्या प्राप्तीकराची फेरतपासणी करण्याला आव्हान देणारी काँग्रेसची याचिका न्यायालयानं गेल्याच आठवड्यात फेटाळली होती. तेच आदेश गेल्या चार वर्षांसाठीच्या याचिकांनाही लागू राहतील, असं उच्च न्यायालयानं  सांगितलं.

<><><><><>

केंद्रसरकारने २०२४-२५ या वर्षासाठी मनरेगा, अर्थात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायद्या अंतर्गत रोजगाराच्या सुधारित दराची  अधिसूचना जारी केली आहे.  त्यानुसार अकुशल कामगारांना प्रति दिवस मिळणाऱ्या वेतनाचा दर हरियाणा मध्ये ३७४ रुपये, गोव्यामध्ये ३५६, कर्नाटकमध्ये ३४९ रुपये, केरळमध्ये ३४६, तर पंजाबमध्ये ३२२ रुपये इतका असेल. येत्या १ एप्रिलपासून सुधारित वेतन दर लागू होणार असल्याचं ग्राम विकास मंत्रालयानं म्हटलं आहे. मनरेगा अंतर्गत  वेतनामधली यापूर्वीची सुधारणा गेल्या वर्षी मार्चमध्ये अधिसूचित करण्यात आली होती.

<><><><><>

आर्मी कमांडर्सची परिषद आजपासून नवी दिल्लीत सुरु होत असून लष्कर प्रमुख जनरल मनोज पांडे आज कमांड मुख्यालयातून दूरस्थ पद्धतीने कमांडर्सना संबोधित करतील. तर संरक्षण मंत्री राजनाथ सिंग या परिषदेला  २ एप्रिल रोजी संबोधित करणार आहेत.

<><><><><>

२०२४-२५ या शैक्षणिक वर्षांपासून सर्व विद्यापीठांनी पीएचडी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी केवळ  नेट स्कोअर, म्हणजेच  राष्ट्रीय पात्रता चाचणीचे गुण ग्राह्य धरावेत, असे निर्देश युजीसी, अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगानं दिले आहेत. त्यानुसार २०२४-२५ या शैक्षणिक वर्षांपासून पीएचडी अभ्यासक्रमासाठी विविध विद्यापीठं आणि उच्च शिक्षण संस्थांच्या प्रवेश परीक्षांऐवजी केवळ नेट परीक्षेचा निकाल ग्राह्य धरला जाईल, असं यूजीसीचे अध्यक्ष मामीडला जगदेश यांनी समाज माध्यमावरच्या पोस्ट मध्ये लिहिलं आहे. जून २०२४ च्या शैक्षणिक सत्रासाठी नेट परीक्षेच्या अर्ज प्रक्रियेवर राष्ट्रीय चाचणी संस्था काम करत असून, पुढल्या आठवड्यात याबाबतची माहिती उपलब्ध होईल, असं यात म्हटलं आहे.

<><><><><>

राष्ट्रीय चाचणी संस्थेनं  यावर्षी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या जेईई मुख्य परीक्षेच्या दुसऱ्या सत्राच्या अर्जदारांना परीक्षेचं शहर वितरित करण्याबाबतची आगाऊ सूचना जारी केली आहे.

जेईई मुख्य परीक्षेचं दुसरं सत्र येत्या ४ ते १२ एप्रिल या काळात एकूण ३१९ शहरांमध्ये  आयोजित करण्यात आलं असून, यामध्ये भारताबाहेरच्या २२ शहरांचा समावेश आहे.

**<><><><><>**

फाल्गुन वद्य तृतीया ही छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीनुसार साजरी होणारी शिवजयंती आज विविध ठिकाणी मोठ्या उत्साहाने साजरी होत आहे. शिवाजी महाराजांचे जन्मस्थळ असलेल्या किल्ले शिवनेरीवर विविध सामाजिक संस्थांनी तसंच  गड किल्ले संवर्धक मंडळांनी शिवजयंती साजरी केली. यावेळी अनेक राजकीय नेतेही उपस्थित होते.

**<><><><><>**

स्पेनमध्ये सुरु असलेल्या माद्रिद खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी व्ही सिंधू नं महिला एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे.आज तिचा सामना तैवानच्या हुआंग यू-सुनशी होणार आहे. पुरुष दुहेरीत भारताच्या कृष्ण प्रसाद गर्ग आणि साई प्रतीक या जोडीनं कॅनडाच्या खेळाडूंना पराभूत करत उप उपांत्यपूर्व फेरीत गाठली आहे. महिला दुहेरी स्पर्धेत तनिषा क्रॅस्टो आणि अश्विनी पोन्नप्पा या जोडीचा सामना आज उपउपांत्यपूर्व फेरीत ऑस्ट्रेलियाच्या टिफनी हो आणि ग्रोनिया सोमरविले यांच्याशी होईल.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट मध्ये आज संध्याकाळी जयपूरच्या सवाई मानसिंग स्टेडियमवर राजस्थान रॉयल्सचा सामना दिल्ली कॅपिटल्स बरोबर होणार आहे. संध्याकाळी साडेसात वाजता सामना सुरू होईल.

हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर काल रात्री सनरायझर्स हैदराबादनं  मुंबई इंडियन्सचा ३१ धावांनी पराभव केला.

**<><><><><>**

राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि केंद्र  सरकार यांच्या वतीनं  आयोजित करण्यात आलेल्या ९ व्या राष्ट्रीय लघुपट स्पर्धेत रशीद निंबाळकर लिखीत आणि दिग्दर्शित "ऱ्हास" या मराठी लघुपटाला राष्ट्रीय पुरस्कार जाहीर झाला आहे. या स्पर्धत सहभागी झालेल्या  १३९ लघुपटातून "ऱ्हास" या एकमेव लघुपटाची महाराष्ट्रातून निवड झाली आहे. या लघुपटाची निर्मिती गिरिश गवळी यांनी केली आहे.

आधुनिक भारतातील भटक्या समाजाचं जीवन या चित्रपटातून मांडण्यात आलं आहे.

**<><><><><>**